नि.फौ.ख.कं.१७०/२०१७.
सरकार-वि-विलास उर्फ कैलास
निशाणी क.०९

# सरकारतर्फे साक्षदार क.०१ ची जबानी

मी शपथेवर सांगते की,

**माझे नांव :** रविता **माझे वडीलाचे/पतीचे नांव:** प्रविण कुंभरे
**वय** - २४ वर्षे, **व्यवसाय** - शेतमजुरी,
**राहणार :** कलंभा, **तह.** काटोल, **जिल्हा** - नागपूर

-----------------------

**सरतपासणी-सरकारतर्फे ॲड. श्री. व्ही.यु. मिरचे, ए.पी.पी.**

मी आरोपीला ओळखते कारण तो माझ्या गावचा आहे. घटना दि.१०.१०.२०१७ रोजी रात्री ०८.३० वाजताच्या दरम्यान माझ्या घरासमोर रस्त्यावर घडली. त्यावेही मी व माझे कुटुंबिय घरात हजर होतो. माझ्या घरात माझी आई, मी, बाबा, भाउ हजर होतो. आरोपी माझ्या आईला संजय जुनघरे यांच्या विहिरीवर पाण्याला जायचे नाही असे सांगत होता. आरोपी दारु पिवून होता व माझ्या वडिलांना शिवीगाळ करीत होता. तो माझ्या बाबाला चाटी, टकल्या असे म्हणत होता. माझ्या आईने त्याला शिवीगाळ करु नका असे म्हटले असता त्याने त्याच्या हातातील झील्पी / काडीने मारहाण करायला सुरुवात केली. त्याने माझ्या आईला डाव्या हातावर काडीने मारले व पोटावर मारले. मी भांडण सोडवायला गेली असता आरोपीने मला पण एक काडी मारली. त्याने माझ्या हातावर काडी मारली होती. माझी आई बेहोश पडली होती. आम्ही तिला पोलीस स्टेशनला आणले होते. पोलीसांनी माझ्या आईला सरकारी दवाखान्यात पाठविले होते व तिथे माझ्या आईला भरती केले. मी पोलीसांकडे रिपोर्ट दिला होता. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **नि.क.१०** देण्यात आले. आता मला छापील एफआयआर दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यलाा **नि.क.११** देण्यात आले. पोलीसांनी मला विचारपूस केली होती आणि माझा बयाण नोंदविला होता. ज्या काडीने/झिल्पीने मला मारहाण झाली ती काडी/झिल्पी दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला या गुन्हयात जप्त करण्यात आलेली झिल्पी/काडी दाखविण्यात आली. ती तीच झिल्पी आहे. त्याला **आर्टीकल 'अ'** देण्यात आले.

**उलट तपास आरोपी तर्फे ॲड. श्री. एन.ए. बेलसरे.**

माझे लग्न झाले आहे. माझे पती खरसोली या गावी राहतात. संजय जुनघरे यांची विहिर आरोपीच्या मालकीची नाही. आम्ही आधी पोलीस स्टेशनला आलो आणि पोलीसांनी माझ्या आईला दवाखान्यात पाठविले होते. त्या आधी आम्ही फिर्याद दिली नव्हती. माझ्या आईला नागपूरला भरती करण्यापूर्वी मी फिर्याद दिली होती.

माझी आई बेहोश पडली होती हे मी माझ्या फिर्याद आणि बयाणामध्ये सांहिगतले होते मात्र पोलीसांनी तसे माझ्या बयाणात आणि फिर्याद मध्ये कां नोंदविले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. असे घडले नाही की, मी फक्त मला झालेल्या मारहाणीबाबत व घटनेबाबत पोलीसांकडे फिर्याद दिली होती.

**मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे साक्षीदाराचा उलट तपास थांबविण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्विकृती** **समक्ष**

**(एम.व्ही. चव्हाण)**
**न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे., काटोल.**
**दि.०५/०२/२०२०.**

**(एम.व्ही. चव्हाण)**
**न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे.**
**काटोल.**

**मध्यान्हानंतर साक्षीदाराचा उलट तपास शपथेवर पुन्हा सुरु.**

आरोपीने माझ्या आईच्या डाव्या हातावर मारल्याबाबत मी बयाण देतांना पोलीसांना सांगितले होते मात्र पोलीसांनी माझ्या बयाण व रिपोर्ट मध्ये हातावर मारल्याबाबत कां नमूद केले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. आता मला माझ्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ मधील मजकुर वाचुन दाखविण्यात आला तो मजकुर बरोबर आहे. असे झाले नाही की, या घटनेची फिर्याद माझ्या आईने दिली होती.

हे म्हणने खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी माझ्या पतीच्या घरी खरसोली येथे होती. हे म्हणने खरे नाही की, या घटनेची फिर्याद मी दिली नव्हती. हे म्हणने खरे नाही की, या घटनेची फिर्याद माझ्या आईने दिली होती.

हे म्हणने खरे आहे की, आज मला दाखविण्यात आलेला मुद्देमाल काडी आहे. हे म्हणने खरे नाही की, या झील्पी काडीने आरोपीने मला व माझ्या आईला मारहाण केली नाही व त्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने आम्हाला मारहाण केलीच नाही म्हणून मी त्याने माझ्या आईला व मला शरीराच्या कोणत्या भागावर मारले याबाबत मी निश्चित सांगु शकत नाही. हे म्हणने खरे नाही की, आज रोजी मी शपथेवर खोटे बयाण देत आहे.

**उलट तपास संपला**

**फेरतपासणी ---- काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती** **समक्ष**

**(एम.व्ही. चव्हाण)**
**न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे., काटोल.**
**दि.०५/०२/२०२०.**

**(एम.व्ही. चव्हाण)**
**न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे.**
**काटोल.**

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word, as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik